# संत वाङ्मय आणि महाराष्ट्रीय संस्कृती

**वैदेही गायकवाड**
अहमदनगर

संत वाङ्मय आणि महाराष्ट्रीय संस्कृती यांचा अतिशय जवळचा संबंध आहे. कारण संत वाङ्मयाने महाराष्ट्रीय लोकजीवनाला वेगळा असा आकार देण्याचा महत्त्वपूर्ण असा प्रयत्न केलेला आहे. मध्ययुगीन काळात संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत रामदास आणि संत तुकाराम यांनी आपल्या साहित्यातून भरकटलेल्या समाजजीवनाला एक दिशा आणि प्रेरणा देण्याचे काम आपल्या साहित्यातून केले. त्यांनी फक्त साहित्यरचना केली नाही तर साहित्यातून आदर्श संस्कृती निर्माण करून समाजमनावर बिंबविण्याचे महान कार्य केले. म्हणूनच संत साहित्य आणि महाराष्ट्रीय संस्कृती यांचा अतिशय घनिष्ठ संबंध आहे.

महाराष्ट्रीय संस्कृतीमध्ये प्राचीन काळातील संत साहित्य साधना यांचा अतिशय मोलाचा वाटा आहे. याबद्दल प्र. न. जोशी म्हणतात की, "धर्म, तत्त्वज्ञान, आत्मविचार, पूजापाठ विधी यांना दैनंदिन जीवनात महत्त्वाचे स्थान प्राचीन काळी असल्याने वाङ्मय अथवा साहित्य साधनाही याच क्षेत्रात प्रामुख्याने झालेली दिसून येते. संस्कृत, प्राकृत व मराठी या भाषांतूनही साहित्य निर्मिती होत राहिली. शालिवाहन राजाची 'गाथा सप्तशती' हा एक अव्वल दर्जाचा ग्रंथ मानावा लागेल. गुप्त व वाकाटक परंपरेत अनेक संस्कृत कवींना राजाश्रय मिळालेला दिसतो. कालिदासाने 'मेघदूत' विदर्भात रचले असल्याचे समजतात. वाकाटक नृपती काव्यरचना करीत. सर्वसेन याने प्राकृत भाषेत 'हरिविजय' नावाचे काव्य लिहिले. द्‌वितीय प्रवरसेनाने 'सेतूबंध' व 'रावणवहो' ही काव्ये निर्माण केली. काही गाथाही स्फूट स्वरूपात त्याच्या नावावर असाव्यात. राष्ट्रकूट राजाच्या कारकिर्दीत कवी पुष्पदंत याने महापुराणात यशोधरचरित व नागकुमारचरित असे काव्यग्रंथ लिहून नाव कमावले. चालुक्याचा सहावा विक्रमादित्य व तिसरा सोमेश्वर हे दोन राजे मोठे विद्‌याप्रेमी होते. काश्मीरचा कवी बिल्हण राजकवी होता. त्याचे 'विक्रमांकदेवचरित' नावाचे काव्य याच सुमाराचे. याच विक्रमाच्या दरबारातील पंडित विज्ञानेश्वर याने याज्ञवल्क्य स्मृतीवर मिताक्षरी नामक टीका लिहिली. याच परंपरेतील सोमेश्वराने मानसोल्लास अथवा अभिलाषितार्थ चिंतामणी या नावाचा ग्रंथ लिहिला. यादवकाळातील भास्कराचार्यांचे 'सिद्धांत शिरोमणी' व 'करणकुतूहल' हे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. ज्योतिष आणि गणित या दोन विद्‌यांचे संवर्धन भास्कराचार्यांनी केले. याच काळातील हेमाद्री पंडिताने 'चतुवर्ग चिंतामणी नावाचा ग्रंथ लिहून व्रत, दान, तीर्थ, मोक्ष, श्राद्ध, मुहूर्त इत्यादींचे विस्ताराने वर्णन केले आहे यानेच वाग्भटाच्या अष्टांगहृदयावर 'आयुर्वेद रसायन' नावाची टीका लिहिलेली आढळते. बोपदेव हा याच काळाचा एक पंडित कवी. व्याकरण, ज्योतिष, साहित्यशास्त्र, वैद्‌यक इत्यादी विविध विषयांवर याची रचना आहे. सिंधणाचा श्रीकरणाधिप सोढल या काश्मिरी ब्राह्मणाचा 'संगीत रत्नाकर' हा एक उल्लेखनीय ग्रंथ या काळातलाच. यादवाच्या काळात महानुभाव व वारकरी या दोन पंथांची उभारणी झाल्याने त्यांच्या आश्रयाने मराठी वाङ्मय साधनेस जोर चढला. मुकुंदराजांचा 'विवेकसिंधू', ज्ञानेश्वरांची 'ज्ञानेश्वरी' व

अनुभवामृत इत्यादी ग्रंथांबरोबर महानुभावांच्या 'लीळाचरित्र', 'पूजावसर', 'सूत्रपाठ', 'दृष्टांतपाठ' इत्यादी ग्रंथांनी प्राचीन मराठी वाङ्‌मयाची वाढ झाली."1 प्राचीन महाराष्ट्राच्या साहित्यसाधनेमधून अनेक ग्रंथ संत साहित्यावर निर्माण झाले. या संत साहित्याने भरकटलेल्या समाजमनाला योग्य मार्गावर घेऊन जाण्याचे काम केले. एवढेच नाही तर महाराष्ट्रीय संस्कृतीत या साहित्य ग्रंथाने मोलाची भर घातली. म्हणूनच महाराष्ट्रीय संस्कृतीमध्ये मध्ययुगीन काळातील संतांचा आणि त्यांच्या ग्रंथांचा वाटा हा अतिशय मोलाचा आहे.

संत वाङ्‌मय आणि महाराष्ट्रीय संस्कृती यांचा सहसंबंध सांगताना डॉ. अनिल सहस्रबुद्धे म्हणतात की, "महाराष्ट्राच्या मातीला अध्यात्माचा सुगंध आहे. वैदिक, अवैदिक, अद्‌वैत मंत्राचे गहिवरलेले मिलन आहे. शैव, शाक्त, गाणपत्य, दत्त, नाथ, वैष्णवी, महानुभाव, रामदास, सूफी, पारशी, जैन, बुद्ध, शीख मतपंथाचे अध्यात्मिज्ञक प्रवाह परस्पर सामंजस्य, सामरस्य वृत्तीने प्रचलित आहेत. ऋषी, मुनी, सिद्ध, साधक, अनुचर या सर्वांच्या अनादि आणि अनंत परंपरा आहेत. भारतीय परंपरांचा युगायुगांचा नित्य प्रगमन आणि परिवर्तनशील समृद्ध अंतःस्त्रोत महाराष्ट्राच्या जलौघातून जीवनदायित्वाने प्रवाहित आहे. शक्तिपीठे, ज्योतिर्लिंग, सिद्धिविनायक स्थाने, राम, कृष्ण आदी वैष्णव अवतार स्थाने, क्षेत्रे, तीर्थे, भैरव, मारुत आदी लोकदैवते यांची मांदियाळी महाराष्ट्रात आहे. या सर्वांच्या संस्कारित पिंडत्वाने महाराष्ट्र सात्त्विक आणि महंत राष्ट्र म्हणून प्रसिद्ध आहे पांडुरंग विठ्ठलाच्या नारदीय भक्तिपरंपरेत या सर्व वैविध्यपूर्ण अध्यात्मिक संवेदनांनी आपापली स्पंदने हळूवारपणे जागवित समावेशन केले आहे. आपापल्या पृथक अस्तित्वात भक्तिसाधनेचा समान योग राग आळवित यात्रा, जत्रा, सणोत्सव, जयंत्या-पुण्यतिथ्या उत्सव, याग, अनुष्ठाने, होमहवन, सप्त यांच्या परंपरा मनामनात श्रद्धा, भक्ती, ज्ञान, सामरस्य जागवित आहेत."2 महाराष्ट्रीय संस्कृती संत साहित्यामधून समृद्ध झालेली आहे महाराष्ट्रीय संस्कृतीमध्ये वेगवेगळे धर्म, पंथ, भाषा, विविध तीर्थस्थाने यांना अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. संत साहित्यामधून या सर्वांचा नेहमीच जागर झालेला आहे. संत साहित्यामधून ज्ञान, तत्त्वज्ञान आणि विविध मूल्यांची मांडणी आलेली आहे. यातून समाजमनाला दिशा आणि प्रेरणा तर मिळतातच; त्याचबरोबर महाराष्ट्रीय लोकजीवनातील वैभवात मोलाची भर पडताना दिसते.

संत साहित्य आणि महाराष्ट्रीय संस्कृतीबद्दल रा. चिं. ढेरे यांचे मत अतिशय उल्लेखनीय आहे. ते म्हणतात की, "मराठी साहित्याच्या इतिहासाची पहिली पाच शतके संतकवींनी गाजवली आहेत. संत, पंत आणि तंत या त्रिविध ग्रंथकारांपैकी संत आणि संतपरंपरेतील ग्रंथकार हे विपुल संख्येने, उदंड ग्रंथकर्तृत्वाने आणि प्रचंड प्रभावाने महाराष्ट्रात गाजत राहिले आहेत. संतांचे आणि संतांविषयीचे प्राचीन साहित्य इतके विपुल, विविध आणि वैचित्र्यपूर्ण आहे की, आधुनिक अभ्यासकांच्या चार पिढ्या उलटल्या, तरी त्या साहित्याचा पैलपार अजून दृष्टिपथात आलेला नाही. कोणी त्याकडे राष्ट्रीय दृष्टीने पाहून त्याला शिवकालीन राजकीय उत्थानाची पार्श्वभूमी सिद्ध करण्याचे श्रेय दिले, तर कोणी याच दृष्टिकोनातून त्याचे मूल्यमापन करताना त्याला राष्ट्रीय अधःपाताचे कारण मानले. कोणी त्याकडे सामाजिक दृष्टीने पाहून त्याला विषमतेविरुद्ध विद्रोह उभा करण्याचे श्रेय दिले, तर कोणी याच

दृष्टिकोनातून त्याचे स्वरूप न्याहाळताना त्याला विषमप्रधान समाजव्यवस्थेचे समर्थक मानले. या आधुनिक अभ्यासकांच्या दृष्टिकोनाकडे संपूर्ण दुर्लक्ष करून शुद्ध अध्यात्मिक दृष्टीने संत साहित्यातून प्रेरणा घेणारा जरा एक जाणत्या प्रामाणिक साधकांचा वगर्् आहे तसाच संत साह्त्यितील विद्रोही तत्त्वांवर आवरण घालून त्याचे उपयोजन पारंपरिक मूल्यांच्या समर्थनासाठी करणाऱ्या सनातन्यांचाही एक मोठा वर्ग आहे. हा सनातन्यांचा वर्ग स्वतःला संतपरंपरेचा अनुयायीच मानीत राहिला आहे, हे मुद्दाम ध्यानी घ्यायला हवे. या वर्गाने संतपरंपरेतील मठ-मंदिरांचे आणि संस्था-संघटनांचे नेतृत्व कौशल्याने आपल्याकडे घेतलेले असल्यामुळे, तसेच कीर्तन-प्रवचनादि पारंपरिक प्रभावी प्रचारमाध्यमे त्यांच्याच हाती असल्यामुळे त्यांची संत साहित्य समीक्षा ही सर्व महाराष्ट्रभर सातत्याने प्रस्तुत होत राहिली आहे; आणि याचा स्वाभाविक परिणाम म्हणून संतांविषयीचे अनेक समज-असमज समाजाच दृढमूल होत राहिले आहेत. विशेषतः संत साहित्याची सामाजिक फलश्रुती आकळण्यात या वर्गाच्या समीक्षेचा मोठाच अडसर निर्माण झालेला आहे."3 'बुडती हे जन देखवेना डोळा' अशा कळवळ्याने लोकांपर्यंत जाणारे संत आपले भावानुभव या विचार माध्यमातून संत साहित्य निर्माण करत राहिले. लोकांचे कल्याण व्हावे हाच उद्देश संत साहित्याचा होता. संतांनी आपल्या साहित्यामधून संस्कृतीची मांडणी केली. आकांक्षा, श्रद्धा, आचारविचार, लोकांची दैवते याविषयी सविस्तर मांडणी करून लोकांना उपदेश आपल्या साहित्यामधून केला. यातून महाराष्ट्रातील लोकांनी जीवन तत्त्वज्ञान मिळाले आणि लोकसंस्कृतीची आचरणपद्धती सुधारली. म्हणून संत साहित्य हे महाराष्ट्रीय संस्कृतीचे महान वैभव आहे, असेही येथे म्हणता येते.

महाराष्ट्रीय संस्कृतीमध्ये संत ज्ञानेश्वर यांनी आपल्या साहित्यामधून मोलाची भर घातली. याबाबत रा. चिं. ढेरे म्हणतात की, "ज्ञानदेव हे मराठी अस्मितेचे एक आद्य शिल्पकार आहेत. मराठी लोकसंस्कृतीचे एक उन्नायक आहेत. हे आपणा सर्वांनाच परिचित आहे, मान्यही आहे. 'मराठी लोकसंस्कृती' हे शब्द मी 'मराठी फोक कल्चर' एवढ्या सीमित अर्थाने वापरलेले नाहीत. मराठी लोकसंस्कृती ही मराठी लोकांची संस्कृती या अर्थाने इथे मला अभिप्रेत आहे. ही मराठी लोकांची संस्कृती प्राधान्याने लोकसंस्कृती आणि संतसंस्कृती यांचा जिव्हाळा नात्यातून घडलेला आहे संतांनी लोकसंस्कृतीची उपेक्षा केली नाही आणि नागर संस्कृतीची अवहेलनाही केली नाही. लोकांपासून दुरावलेल्या अभिजनांच्या संस्कृतीचे सर्व वैभव त्यांनी शुद्धीकृत रूपात वारसदारांच्या हक्काने प्राप्तकेले आणि त्या वैभवाचा लाभ लोकसंस्कृतीला करून दिला. याउलट लोकसंस्कृतीतील सर्व सत्त्वगर्भ आशयाचा, तिच्या सहज सौंदर्याचा त्यांनी शोधपूर्वक स्वीकारलेला, नितांत आस्थेने स्वीकार केला आणि अभिजनाच्या संस्कृतीला लोकसंस्कृतीचे केवढे योगदान असू शकते, याचा अनुभव आपल्या साहित्यातून दिला. या दोन दुरावलेल्या संस्कृतीधारांचा प्रीतिसंगम म्हणजेच संतप्रणित संतप्रभावित मराठी संस्कृती होय. ही नवी संस्कृती घडविणाऱ्या संतांमध्ये ज्ञादेव अग्रणी तर आहेतच, परंतु ते सर्वश्रेष्ठही आहेत. त्यांच्या काळातले अन् त्यांच्यानंतरचे सर्व संत हे त्यांचे ऋणी आहेत हे ऋण आपण शोधून सांगण्याचीही गरज नाही, इतके ते स्पष्ट आहे. सर्व संतांनी निरपवादपणे ते मान्य केले आहे. पुन्हा पुन्हा उद्घोषून सांगितले आहे याचमुळे संतांच्या कार्याचा आणि संत साहित्याचा गौरव हा

अंतिमतः ज्ञानदेवांचा गौरव ठरतो."4 संत ज्ञानदेव हे मराठी संत साहित्याचे महामेरू आहेत. त्यांच्या साहित्य तत्त्वज्ञानाची प्रेरणा इतर संतांनी घेऊन संत साहित्य निर्माण केले आणि आपल्या संत साहित्यातून समाज प्रबोधन केले आणि महाराष्ट्रीय संस्कृतीमध्ये अनमोल अशी भर टाकली हेच रा. चिं. ढेरे यांच्या वरील मतावरून स्पष्ट होते.

संत साहित्यामधून महाराष्ट्राची सांस्कृतिक व अध्यात्मिक जडणघडण झालेली असे. संत साहित्यातून विविध भक्तिसंप्रदायाचा उदय झालेला आहे. नाथ संप्रदाय, महानुभाव संप्रदाय, वारकरी संप्रदाय, दत्त संप्रदाय आणि समर्थ संप्रदाय या प्रमुख भक्तिसंप्रदायाचा फार मोठा पगडा महाराष्ट्रीय लोकजीवनावर पडलेला आहे. या पाच भक्तिसंप्रदायाबरोबरच जैन संप्रदाय, लिंगायत संप्रदाय आणि सूफी संप्रदाय याचाही कमी-अधिक प्रमाणात सांस्कृतिक पगडा महाराष्ट्रीय लोकजीवनावर पडलेला आहे. नाथ संप्रदायांमध्ये 'विवेकदपण'- अमरनाथ, 'तत्त्ववास'- चांगावटेश्वर, 'षट्स्थल'- विसोबा खेचर हे महान ग्रंथ नाथ संप्रदायामध्ये निर्माण झाले यातील तत्त्वज्ञान हे महाराष्ट्रीय संस्कृतीमध्ये मोलाची शिकवण देतात.

महानुभाव पंथात परमेश्वराचे पाच अवतार मानले गेले या अवतारातून आणि त्यांच्या ग्रंथनिर्मितीतून महान असा उपदेश लोकांना मिळाला. यामध्ये लीळाचरित्र, स्मृतिस्थळ, श्री दत्तात्रेय प्रभूचरित्र, श्री चक्रधरोक्त सूत्रपाठ, दृष्टांतपाठ, लक्षणरत्नाकर, पंचवार्तिक, स्थानपोथी, रुक्मिणी स्वयंवर, शिशुपालवध, उद्धवगीता, वच्छहरण, सह्याद्रीवर्णन, ज्ञानप्रबोध, ऋद्धिपूरवर्णन, महदंबेचे धवळे यासारखे महान ग्रंथ महानुभव पंथात निर्माण झालेले आहे हे सर्व ग्रंथ महाराष्ट्रीय संस्कृतीत व महाराष्ट्रीय लोकजीवनावर प्रभाव निर्माण करणारे आहेत. भागवत अथवा वारकरी संप्रदायामध्येही अनेक ग्रंथ निर्माण झालेले आहेत. श्री ज्ञानदेवांनी भावार्थदीपिका अर्थाने ज्ञानेश्वरी हा महान ग्रंथ 12व्या शतकात निर्माण केला. हा ग्रंथ वारकरी संप्रदायाचा पायाभूत ग्रंथ मानला जातो. त्याचबरोबर अमृतानुभव चांगदेवपासष्टी, ज्ञानदेवाची गाथा, हरिपाठ हे महत्त्वाचे ग्रंथ महाराष्ट्रीय लोकांसाठी अनमोल असा ज्ञानाचा खजिनाच ठरलेला आहे. संत नामदेवांनीही ज्ञानदेवांचे चरित्र, शतकोटी अभंग रचना, हिंदी अभंग रचना हे ग्रंथ वारकरी संप्रदायात निर्माण झाले.

बाराव्या-तेराव्या शतकातील सर्वच संतांचे कार्य हे महान होते. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, मुक्ताबाई, सोपान, निवृत्तीनाथ, नामदेवांचा गुरू विसोबा खेचर आणि संत गोरा कुंभार हे सर्वच संत महाराष्ट्रीय लोकसंस्कृतीमध्ये मोलाची भर घालतात. त्यांनी आपल्या कृतीमधून आणि साहित्यामधून महाराष्ट्रीय लोकांची सेवा केली. म्हणूनच सर्वच संतांचे कार्य हे महाराष्ट्रीय संस्कृतीमध्ये अनमोल असेच आहे. याच कालखंडात चांगदेव, परिसा भागवत, सावतामाळी, नरहरी सोनार, संत जनाबाई, चोखामेळा, सेना न्हावी, जगमित्रा नागा, जोगा परमानंद, कान्होपात्रा, चोभा, मुकुंदराज या सर्वच संतांनी आपल्या साहित्य सेवेतून महाराष्ट्रीय लोकांची सेवा केली. आपल्या कृती आणि वाणीतून प्रबोधन करण्याचे कार्य केले.

महाराष्ट्रात बाराव्या आणि तेराव्या शतकात समाजव्यवस्था ही अतिशय मोडकळीस आलेली होती. समाजात आर्थिक दुरावस्था झालेली होती. राजकीय जुलूम लोकांना सहन करावा लागत होता.

बौद्धिक बेबंदशाही व अध्यात्मिक गोंधळ यांनी संपूर्ण महाराष्ट्र बुजबुजाटून गेला होता. सर्व समाज विनाशाच्या खाईत सापडलेला होता. शूद्र, ब्राह्मण, प्रजा, राजा आणि शेतकरी हे सर्वच दुष्टचक्रात सापडले होते. विनाशाची खरीखुरी झळ खालच्या वर्गाला भासत होती. यातच महाराष्ट्रीय संतांचे कार्य आणि ग्रंथ हे मोठे आधार देणारे ठरले. संतांनाही सामाजिक संघर्ष करावा लागत होता. समाजातील सर्वच घटकात अगतिकपणा पाहावयास मिळत होता. एक प्रकारची असहायता निर्माण झालेली होती. या निराशाग्रस्त मार्गात एकच आशेचा किरण होता तो म्हणजे संतांनी दाखविलेला भक्तिमार्ग होय.

महाराष्ट्रात भागवत धर्माची पूर्वपरंपरा ही महाराष्ट्रीय संस्कृतीला चालना देणारी होती. याबद्दल बा. रं. सुंठणकर म्हणतात की, "प्राचीन काळापासून हिंदुस्थानच्या इतिहासात भक्तिमार्ग आणि ते अनुसरणारे पंथ यांनी पुनःपुन्हा उचल खाल्लेली दिसून येते ज्या ज्यावेळी समाजात दैन्य आणि दुरावस्था माजून राहत, त्या त्यावेळी त्यातील काही वर्ग देवाकडे धाव घेऊन भक्तिमार्गाचा पुरस्कार करीत होते असे आढळून येते. खुद्द भगवद्गीतेचा जन्मही अशाच परिस्थितीत झाला. विद्वानांच्या मते गीताप्रणित भागवत धर्माचा उदय ख्रि.पू. 1400 च्या सुमारास झाला असावा. या धर्माचा उपदेष्टा कृष्ण हा गणनिष्ट पद्धतीने राहणाऱ्या वृष्णयंधक कुलात जन्माला आला होता. वैदिक आर्यांनी हिंदुस्थान पादाक्रांत केल्यानंतर पूर्वीच्या अवैदिक समाजाला गुलाम आणि शूद्र बनवून टाकले अशा समाजात भक्तिसंप्रदायाचा जोराने प्रसार झाला होता. कृष्ण आणि त्याचा यादव वंश यांना शूद्र गणण्यात येत असे. भारतीय युद्धातील भयंकर विध्वंसानंतर जे दैन्य उद्भवले होते, त्यातच भागवत धर्म उदयाला आला आणि फैलावला. त्यानंतर बुद्धोत्तर काळात इ.स.पू. चौथ्या शतकात या भागवत धर्माने पुन्हा जोराने उठावणी केली. गीतासंप्रदाय, नारायणीधर्म, पांचरात्रमत, वैष्णव संप्रदाय अशा विविध मतप्रवाहाचा संगम होऊन एकीकृत असा भागवत धर्म प्रसुत झाला."5 या मतावरून आपल्या असे लक्षात येते की, भागवत संप्रदाय आणि त्यातील तत्त्वज्ञान महाराष्ट्रीय संस्कृतीमध्ये मोलाची भर घालते.

मध्ययुगीन महाराष्ट्रातील समाजजीवनामध्ये बारा बलुतेदारी आणि अठरा आलुतेदारी पद्धती अस्तित्वात होती. या सर्व आतुले आणि बलुतेदारांमधूनच संतांचा उदय आणि त्यांचे कार्य महाराष्ट्रीय संस्कृतीमध्ये मोलाची भर टाकतात. याविषयी बा. रं. सुंठणकर म्हणतात की, "महाराष्ट्रात बलुतेदार आणि अलुतेदार हे वर्ग भक्तिमार्गाचा पुरस्कार करीत होते. याचा अर्थ हाच की या वर्गाचे जीवन दुःखमय आणि कष्टप्रद झाले होते आणि म्हणून ते ईश्वरभक्तीकडे धाव घेत होते. अलुतेदार-बलुतेदार हे महाराष्ट्रीय समाजपद्धतीचे अविभाज्य असे विशिष्ट घटक होते. या घटकांचे जीवन दुःख, कष्ट, दुरवस्था यांनी व्याप्त झाले होते. त्यामुळे संसाराबद्दलचा वैताग त्यांच्यात निर्माण होत होता. घटकवर्गाचे दुःखी जीवन स्पष्टपणे हेच दर्शविते की, ज्या समाजव्यवस्थेचे ते घटक होते ती मोडकळीस आली होती; उद्ध्वस्त होऊ पाहत होती. अशा प्रकारे मोडकळीस आलेली समाजव्यवस्था पार मोडून टाकून तिच्या ठिकाणी नवीन समाजव्यवस्था निर्माण होणे ही केवळ महाराष्ट्राचीच नव्हे, तर साऱ्या हिंदुस्थानची ऐतिहासिक गरज होती. समाजव्यवस्थेतही क्रांती करणारा एक प्रबळ वर्ग निर्माण व्हायला पाहिजे होता. तसा तो तेथे झाला नाही. त्याऐवजी महाराष्ट्रात आणि हिंदुस्थानच्या

इतर भागात भक्तिमार्गाचे मोठे आंदोलन सुरू झाले. या आंदोलनात समाजातील असंतुष्टता प्रतिबिंबित झाली होती. त्या काळातील सामाजिक झगडा संत चळवळ आणि संत वाङ्मय यात निराळ्या प्रकारे भक्तिमार्गाची मुरड घेऊन उमटला आहे. या झगड्याचे नेतृत्व वर सांगितल्याप्रमाणे अलुते बलुतेदारांकडे होते. तत्कालीन समाजपद्धतीत या वर्गाची सर्वात अधिक कुचंबणा होत होती. त्यांचे व्यवसाय नीट चालत नव्हते. पुरोहितशाहीच्या वर्चस्वामुळे त्यांना समाजात हीन स्थान प्राप्त झाले होते. सावतामाळी, चोखामेळा, तुकाराम वगैरेंच्या अभंगांत त्यांच्या 'हीन जाती'विषयीचे उद्वेगपूर्ण उल्लेख आहेत. समाजाच्या प्रगतीच्या आड येणारे पुरोहितशाहीचे जाचक निर्बंध, त्यामुळे निर्माण झालेले धार्मिक आणि सामाजिक भेदाभेद आणि विषमता नाहीशी करून टाकायला हा वर्ग उद्युक्त झाला होता. दुरावस्थेच्या चक्रातून समाजाचे रक्षण व्हावे म्हणून हा वर्ग धडपडत होता कारण त्यात त्याच्या स्वतःच्या वर्गाचेही हित होते. प्रतिकूल परिस्थितीशी सामना देऊन त्यातून निभावून बाहेर निघण्याकरिता ईश्वरभक्तीशिवाय दुसरा मार्ग त्यांना दिसत नव्हता जुन्या जीवनातून बाहेर पडण्याची धडपड संतांच्या वाणीत स्पष्टपणे दिसून येते. या धडपडीने संत वाङ्मय भरून गेले आहे."6 मध्ययुगीन संत वाङ्मयाकडे समाजातील खालचा स्तर अधिक आकर्षित झाला. तत्कालीन समाजव्यवस्थेमधील बलुतेदार आणि अलुतेदार यांच्या समाजजीवनाला अधिक गती देण्याचे काम संत वाङ्मयाने केले. यातून या समाजाला जीवन जगण्याचा नवा मार्ग भक्तिमार्गाच्या रूपाने सापडला. म्हणून समाजातील बलुतेदार आणि अलुतेदार हेच खरे महाराष्ट्रीय संस्कृतीचे रक्षक मानले जातात

महाराष्ट्रीय जनतेला संतांची शिकवण ही अतिशय मोलाची वाटत होती. ईश्वर हा एकच आहे हे सांगून संतांनी समाजाला एकेश्वरवादाचे तत्त्व शिकविले. ईश्वराची भक्ती करा आणि तो करण्याचा सोपा मार्ग म्हणजे त्याच्या नामाचा जप करा. त्यासाठी वेळ, काळ पाळण्याची गरज नाही. ईश्वराचे नाम कुठेही, केव्हाही जपा, त्याद्वारे ईश्वराची भक्ती श्रेष्ठ ठरते. ईश्वराच्या भक्तीसाठी मूर्ती नको, पूजाअर्चा नको, विधी नको, मंत्रतंत्र नकोत तर साधे आचरण आणि निर्मळ अंतःकरण असावे म्हणजेच मूर्तिपूजा, कर्मठपणा आणि दांभिकता यावर संतांनी चौफेर हल्ले आपल्या साहित्यातून चढविले. देवाला प्रसन्न करण्यासाठी शुद्ध भावना हवी हे संतांचे तत्त्वज्ञान सर्वसामान्य माणसाला पटले, उमजले. यातून महाराष्ट्रीय संस्कृतीची भरभराट होत गेली. म्हणूनच संत साहित्य आणि महाराष्ट्रीय संस्कृती यांचा अतिशय घनिष्ठ संबंध आहे, असेही या अभ्यासाने आपल्या समोर ठामपणे मांडता येते.

संत साहित्यातील व मराठीतील आद्य ग्रंथ 'लीळाचरित्र' हा महान ग्रंथ यादवकाळात म्हणजे बाराव्या-तेराव्या शतकात लिहिला गेला. 'लीळाचरित्रा'मध्य म्हाइंभटांनी चक्रधर स्वामींचे चरित्र मांडलेले आहे. त्याचप्रमाणे बाराव्या-तेराव्या शतकात अनेक प्रेरणादायी ग्रंथ संत साहित्यात निर्माण झालेले आहेत. याबाबत डॉ. यु. म. पठाण म्हणतात की, "बाराव्या आणि तेराव्या शतकात 'विवेकसिंधू' व 'ज्ञानेश्वरी' यासारख्या काव्यग्रंथांची निर्मिती झाली होती; त्याचप्रमाणे नरेंद्रविरचित 'रुक्मिणी स्वयंवरा'सारख्या महाकाव्याची वा महाकाव्यसदृश्य आख्यान काव्याची रचनाही झाली होती. अभंगातून यादवकालीन संतकवींनी आपली भक्तिभावना आविष्कृत केली होती. तथापि, 'लीळाचरित्रा'ची निर्मिती झाली नसती, तर मध्ययुगीन मराठी साहित्यात मोठीच पोकळी निर्माण झाली असती. मराठी गद्याचा

उद्गम व्हावयास बहमणी काळापर्यंत किंवा शिवकाळापर्यंत प्रतीक्षा करावी लागली असती, वाट पाहावी लागली असती. 'लीळाचरित्र' हा ग्रंथ म्हणजे पुढील काळात निर्माण झालेल्या अनेक महानुभावीय गद्य ग्रंथाची गंगोत्रीच होय."7 सर्वच संत साहित्यातील ग्रंथ हे आदर्श परंपरा आणि नीतिमूल्यांची शिकवण देणारे आहेत. समाजात माणसांचे वर्तन कसे असावे याचीच शिकवण संत साहित्यातील ग्रंथ देतात. एकूणच संत साहित्य आणि महाराष्ट्रीय संस्कृती यांचे नाते हे अतूट आहे संत साहित्यातून संस्कृती निर्माण झालेली आहे आणि संत साहित्य संस्कृती घडविण्याचे आणि तिचा प्रसार-प्रचार करण्याचे महत्त्वाचे माध्यम आहे, हे या अभ्यासातून उलगडत जाते.

संदर्भ ः-

1) 'प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास', जोशी प्र. न., स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती 2002, पृ.क्र. 22.
2) 'कैवल्यगंध', सहस्रबुद्धे (डॉ) अनिल, आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्ट, अहमदनगर, प्रथमावृत्ती 2016, पृ.क्र. 7.
3) 'संत, लोक आणि अभिजन', ढेरे रा. चिं., पद्मगंधा प्रकाशन, पुणे, नवीन आवृत्ती 2013, पृ,क्र. 15.
4) तत्रैव, पृ.क्र. 55.
5) 'महाराष्ट्रीय संतमंडळींचे ऐतिहासिक कार्य', सुंठणकर बा. रं., लोकवाङ्मयगृह मुंबई, चौथी आवृत्ती 2017, पृ.क्र. 26 व 27.
6) तत्रैव, पृ.क्र. 31.
7) 'संतसाहित्य शोध आणि बोध', पठाण यु. म., दिलीपराज प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती 2014, पृ.क्र. 42.